# RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE, MUMBAI-19

## Dept. of Marathi

## Minutes of the meeting of the Board of Studies

Date: **13 August 2025**
Time: **2 pm**
Venue: **Google Meet**
Members Present: 07

| Sr. No. | Name | Signature |
|---|---|---|
| **1.** | **Shilpa Neve** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **2.** | **Ashlesha Rane** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **3.** | **Pratik Pawar** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **4.** | **Rashmi Warang** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **5.** | **Anagha Pendse** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **6.** | **Vaishali Jawalekar** | **Google meet ( Online Conference Call)** |
| **7.** | **Anand Katikar** | **Google meet ( Online Conference Call)** |

**1. To confirm the past BoS meeting minutes**
दिनांक २६ मार्च २०२५ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यासमोर सादर करण्यात आले आणि सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**2. To discuss the certificate courses that the department is planning to start**
शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मध्ये मराठी विभागातर्फे कोणतेही प्रमाणपत्र अभ्यासक्रम आखण्यात आले नाहीत याची कल्पना अभ्यासमंडळ सदस्यांना देण्यात आली.

**3. To discuss the future course of dept. Curriculum**
पुढील शैक्षणिक वर्षात (२०२६-२७) मराठी विषयाच्या एकूण अभ्यासक्रमात कोणते स्वागतार्ह बदल करता येतील याविषयी विचार करण्याची विनंती शिल्पा नेवे यांनी सर्व अभ्यासमंडळ सदस्यांना केली.

**4. Any other matter by the permission of the chair.**
अभ्यासमंडळ नव्याने गठित झाल्यानंतर ही पहिलीच सभा असल्याने शिल्पा नेवे यांनी कुलगुरूंच्या वतीने नियुक्त सदस्य प्रा. डॉ. वैशाली जावळेकर यांचा परिचय सर्व सदस्यांना करून दिला आणि इतर सदस्यांचा तसेच मराठी विषयाच्या एकूण अभ्यासक्रमाचा परिचय प्रा.जावळेकर यांना करून दिला. नवीन शैक्षणिक धोरणानुसार तृतीय वर्ष मराठीचे अध्यापन रुईया महाविद्यालयात सुरु झाल्याची कल्पना सर्व सदस्यांना देण्यात आली.
सभेच्या अखेरीस शिल्पा नेवे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले.

SLNeve
**शिल्पा नेवे**
**प्रभारी प्रमुख,**
**मराठी विभाग**

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE 1937 MUMBAI-19

**प्रा. डॉ. अनुश्री लोकूर**
**प्राचार्य,**
**रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय**

## शिक्षण प्रसारक मंडळींचे

## रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा, मुंबई

## मराठी विषयाच्या अभ्यास मंडळ सभेचे इतिवृत्त

दिनांक : बुधवार, १८ मार्च २०२६

वेळ: दुपारी १२ ते दुपारी १.३०

स्थळ : बोर्ड रूम, दुसरा मजला, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय

उपस्थित सदस्य: ०७

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. वैशाली जावळेकर | Jawlekar |
| २) | प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे | Attended Online |
| ३) | प्रा. डॉ. आनंद काटीकर | Attended Online |
| ४) | प्रा. अभिजित देशपांडे | |
| ५) | मा. रश्मि वारंग | [illegible] |
| ६) | मा. अनघा पेंडसे | |
| ७) | प्रा. शिल्पा नेवे | [illegible] |
| ८) | प्रतिक पवार | [illegible] |
| ९) | आश्लेषा राणे | Rane |

**ठराव १- मागील इतिवृत्तास मंजुरी**

मागील सभेचे इतिवृत्त मराठीच्या अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांना मेलद्वारे यापूर्वीच कळविले असून सर्व सदस्यांनी त्याला तात्काळ मंजुरी दिल्याबद्दल प्रभारी विभागप्रमुख शिल्पा नेवे यांनी सर्वांचे आभार मानले.

**ठराव २- प्रथम वर्ष, कला, विषयनिष्ठ अभ्यासपत्रिका (FYBA- DSC मराठी) सत्र १ मधील बदल:**

नवीन शैक्षणिक धोरणाच्या द्‌वितीय आवर्तनातही ‘साहित्यप्रकार: नाटक’ ही विषयपत्रिका कायम ठेवून त्यात दुसऱ्या घटकविषयात एकांकिका या नाट्यप्रकाराचा स्थूल परिचय समाविष्ट करून तिसऱ्या घटकात दोन एकांकिका नेमण्याचा प्रस्ताव शिल्पा नेवे यांनी ठेवला आणि त्याला सर्व उपस्थित सदस्यांनी मंजुरी दिली.

तसेच या विषयपत्रिकेच्या चौथ्या घटकामध्ये अजित दळवी लिखित ‘डॉक्टर तुम्हीसुद्‌धा’ ही नाट्यकृती पुढे कायम ठेवणे किंवा त्याऐवजी केदार शिंदे लिखित ‘श्रीमंत दामोदरपंत’ ही नाट्यकृती नेमणे या दोन्ही बाबींना सर्व सदस्यांनी मान्यता दिली. विद्‌यार्थी प्रतिसाद लक्षात घेऊन त्यानुसार यासंदर्भात निर्णय घ्यावा असे सर्व सदस्यांनी सुचविले.

**ठराव ३ - प्रथम वर्ष, कला, विषयनिष्ठ अभ्यासपत्रिका (FYBA- DSC मराठी) सत्र २ मधील बदल**

‘साहित्यप्रकार: कविता’ ही प्रथम वर्ष मराठीच्या द्‌वितीय सत्राच्या अभ्यासक्रमातील विषयपत्रिका पुढच्या वर्षांच्या अभ्यासक्रमात नेण्याचा आणि त्याऐवजी प्रथम वर्ष मराठीच्या द्‌वितीय सत्राच्या अभ्यासक्रमात ‘मराठी ललित गद्‌य’ अशी विषयपत्रिका योजण्याचा विचार शिल्पा नेवे यांनी मांडला. या विषयपत्रिकेच्या पहिल्या घटकात ‘ललित गद्‌य’ या संकल्पनेचा परिचय विद्‌यार्थ्यांना देऊन पुढील 3 घटकांत विविध प्रकारचे आणि आशयवैविध्य असणारे ललित गद्‌य नेमण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**ठराव ४- प्रथम वर्ष कला, विषयनिष्ठ अभ्यासपत्रिका (FYBA- DSC मराठी) सत्र १ आणि २ च्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आणि मूल्यांकन:**

प्रथम वर्ष कला, विषयनिष्ठ अभ्यासपत्रिकेच्या (FYBA- DSC मराठी) दोन्ही सत्रांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पूर्वीप्रमाणेच ठेवण्याचे तसेच मूल्यांकन पद्‌धती महाविद्‌यालयाच्या एकूण परीक्षाविषयक धोरणाला अनुसरून राखण्याचे ठरले.

सत्रांत परीक्षा- गुण ६०, चारही घटकांवर प्रत्येकी १५ गुणांचा अंतर्गत पर्याय असलेला एक प्रश्न. प्रश्नांचे स्वरूप दिर्घोत्तरी/लघुत्तरी/टिपा असे असेल.

अंतर्गत मूल्यमापन- २० गुणांची चाचणी परीक्षा आणि २० गुणांसाठी प्रकल्प/गृहपाठ इ.

**ठराव ५- प्रथम वर्ष कला, व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम (VSC मराठी) मधील बदल आणि प्रश्नपत्रिका स्वरूप:**

प्रथम वर्ष कला, व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमाला (VSC मराठी) विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद असल्याने त्यात बदल न करण्याचे ठरले. त्यामुळे व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम- मराठी

सत्र १- वार्तांकन आणि भाषांतर कौशल्ये

सत्र २- विविध भाषिक कौशल्ये

या विषयपत्रिका, त्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आणि मूल्यांकन पद्धत पूर्वीप्रमाणेच कायम राहील असा निर्णय घेण्यात आला.

**ठराव ६- द्वितीय वर्ष मराठी, सत्र ४ मधील कौशल्यविकास अभ्यासक्रमाची (SYBA मराठी- SEC) आखणी आणि मूल्यांकन:**

द्वितीय वर्ष कला, मराठी, सत्र ४ मधील कौशल्यविकास अभ्यासक्रम (SEC- मराठी) अंतर्गत 'कला संभाषणाची…' अशी विषयपत्रिका आमच्या विचाराधीन असून त्याअंतर्गत

घटक १- श्रवण, उच्चारण, वाचन, भाषण, शब्दसंग्रह अभिवृद्धी आणि वक्तृत्वकलेचा परिचय- महत्त्व

घटक २- निवेदन-सूत्रसंचालन, अभिवाचन, कथाकथन

असे घटक नेमण्याचा प्रस्ताव अभ्यास मंडळापुढे शिल्पा नेवे यांनी ठेवला. या प्रस्तावाला उपस्थित सदस्यांनी मान्यता दिली.

यासंदर्भात अभ्यास मंडळ सदस्य डॉ. वैशाली जावळेकर यांनी सूचना केली की सर्जनशीलता आणि प्रशासकीय स्वरूपाच्या/ व्यावसायिक स्वरूपाच्या गरजा या दोन्हीचा मेळ अभ्यासक्रमात घालता येऊ शकेल. आपण सामान्य विकल्प (GE) किंवा अभ्यासपूरक उपक्रम (CC) या विषयाच्या अंतर्गत जर सर्जनशील लेखनाला वाव देणारे अभ्यासक्रम आखत असू तर कौशल्यविकास अभ्यासक्रमांतर्गत आपल्याला 'स्पर्धा परीक्षांसाठीचे मराठी' किंवा 'प्रशासकीय मराठी' असे अभ्यासक्रम देता येतील का याचा विचार करावा. तसेच पुढील टप्प्यावर सूचीलेखन, मुद्रितशोधन असे घटक पण समाविष्ट करण्याची सूचना त्यांनी केली.

डॉ. वैशाली जावळेकर यांच्या सूचनेस सर्वच सदस्यांनी अनुमोदन दिले. या संदर्भात नक्की अधिक विचार करून असा अभ्यासक्रम आखल्यास तो मेलद्वारे कळवू असे प्रतिपादन शिल्पा नेवे यांनी केले.

या विषयपत्रिकेच्या प्रश्नपत्रिकेचे आणि मूल्यांकनाचे स्वरूप व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम सत्र ३ (VSC) प्रमाणेच ठेवण्याचा निर्णय झाला.

सत्रांत परीक्षा- गुण ३०, दोन्ही घटकांवर प्रत्येकी १५ गुणांचे दीर्घोत्तरी/लघुत्तरी/टिपणे/वस्तुनिष्ठ इ. स्वरूपाचे अंतर्गत पर्याय असणारे प्रश्न

अंतर्गत मूल्यमापन- गुण २०, उपयोजित प्रकल्प/ सादरीकरण इ. याआधारे

**ठराव ७ - द्वितीय वर्ष कला या वर्गांसाठी मराठी विभागाकडून सामान्य विकल्प अभ्यासक्रम (GE) सत्र ४ मध्ये देणे आणि त्याचे मूल्यांकन:**

द्वितीय वर्षाच्या सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना सत्र ३ मध्ये महाविद्यालयाच्या निर्णयाप्रमाणे स्वयं/ NPTEL वरील अभ्यासक्रम सामान्य विकल्प (GE) म्हणून देण्यात येतील याची कल्पना शिल्पा नेवे यांनी सदस्यांना दिली. तर सत्र ६ मध्ये सामान्य विकल्प (GE) या विषयाअंतर्गत महाविद्यालयाकडून अभ्यासक्रमांचे जे विविध पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत त्यात मराठी विभागाकडून पुढील दोन अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यास अभ्यास मंडळाने मंजुरी दिली

अभ्यासक्रम १- मराठी मनोरंजन माध्यमांसाठीचे आशयलेखन ( Content Writing for Marathi Entertainment Media)

घटक १ - विनोदी कार्यक्रमांसाठी संहिता/आशयलेखन (स्टँड अप कॉमेडी, हास्यजत्रा इ. प्रकारचे कार्यक्रम)

२. वास्तवाधारित कार्यक्रमांसाठी संहिता/ आशयलेखन

३. मालिकांसाठी पटकथा आणि संवादलेखन तसेच आकाशवाणी/ चित्रवाणी/ यू ट्यूब वाहिनी यावरील मुलाखती आणि पॉडकास्ट साठीची पूर्वतयारी व लेखन

अभ्यासक्रम २-

चित्रपट दिग्दर्शक संदीप सावंत यांचा 'चित्रभाषा' हा अभ्यासक्रम

(हा अभ्यासक्रम सामान्य विकल्प- GE/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम- Certificate Course/ अभ्यासपूरक उपक्रम- CC यापैकी कोणत्याही प्रकाराच्या अंतर्गत महाविद्यालयाच्या सोयीप्रमाणे देण्यास अभ्यास मंडळ सदस्यांनी मंजुरी दिली.)

दोन्ही अभ्यासक्रमांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार आणि महाविद्यालयाच्या धोरणानुसार ५० गुणांचे मूल्यांकन आणि ते अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शकांनी दिलेले प्रकल्प/ गृहपाठ यांच्याधारे केले जावे असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

बैठकीच्या शेवटी शिल्पा नेवे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे महाविद्यालयाच्या आणि मराठी विभागाच्या वतीने आभार मानले.

शिल्पा नेवे
प्रभारी प्रमुख,
मराठी विभाग

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE 1937 MUMBAI-19

प्रा. डॉ. अनुश्री लोकूर
प्राचार्य,
रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय